**International Journal of Advance and Applied Research**
www.ijaar.co.in
**ISSN – 2347-7075** **Impact Factor – 8.141**
**Peer Reviewed** **Bi-Monthly**
**Vol. 6 No. 40** **September - October - 2025**

# आदिवासी समाज आणि संस्कृती

**डॉ. कृष्णा उत्तम नागरे**

*Corresponding Author – डॉ. कृष्णा उत्तम नागरे*
**DOI - 10.5281/zenodo.17656776**

***सारांश:***

*भारतीय समाज हा विविधतेने नटलेला आहे. सर्व जाती धर्माच्या लोकांना सामावून घेणारी येथील लोकशाही समाजव्यवस्था आहे. या भारतीय समाज व्यवस्थेतीलच एक आदिवासी समाज आहे. जसे प्रत्येक समाजाचे सामाजिक, आर्थिक सांस्कृतिक वेगळेपण आहे. तसे आदिवासी समाजाचेही सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, भौगोलिक आणि पारंपारिक वेगळेपण आहे हे आपल्याला लक्षात येते. आदिवासी समाज हा त्वरित सभोवतालच्या वातावरणाशी जुळवून घेणारा आहे. निसर्गाच्या सानिध्यात रमणारा व स्वच्छंदपणे जीवन जगणारा समाज आहे. अबोल, भोळा, दैववादी व तेवढाच प्रामाणिक आहे. हा डोंगरदऱ्यात राहणारा समाज म्हणून परिचित असला तरी त्याचे स्वच्छ साधे राहणे व आयुष्याकडे सकारात्मकतेने पाहणे ही गोष्ट अनुकरणीय आहे. जल, जंगल, जमीन ही खरी आपली संपत्ती आहे. असे मानणाऱ्या या आदिवासी समाज व संस्कृतीचा थोडक्यात परिचय प्रस्तुत शोधनिबंधात करण्यात आला आहे.*

**प्रास्ताविक** :

आदिवासी समाज आज २१ व्या शतकातही काही अंशी दुर्लक्षित राहिलेला समाज आहे. त्याचा फारसा सामाजिक, आर्थिक विकास झालेला दिसत नाही. आदिवासींचा सामाजिक, आर्थिक विकास झालेला नसला तरीही तो समाज कला, संस्कृतीमध्ये अग्रेसर असलेला पाहायला मिळतो. त्यांनी त्यांची समाज म्हणून जल, जंगल, जमिनीशी कायम असलेली नाळ घट्टपणे आधुनिकतेच्या काळातही पकडून ठेवलेली आहे. तसेच कला - संस्कृतीलाही अंतकरणापासून जोपासण्याचा प्रामाणिक प्रयत्न केलेला आहे. आज घडीला त्यांच्यातील लोक हे काही प्रमाणात शिकलेले आहेत. ते शहरात राहून आधुनिकतेच्या प्रवाहाबरोबर स्वतःला जुळवून घेण्याचा प्रामाणिक प्रयत्न करत आहेत व त्यांचा समाज त्यांच्याशी जुळून घेत आहे. थोडक्यात आपल्या व त्यांच्यामध्ये होणाऱ्या बदलांचा तो हळूवारपणे स्वीकार करत आहे. आदिवासी समाज आज जगाच्या तुलनेत कोसो दूर असला तरीही तो समाधानाचे जीवन जगत आहे. त्यांच्याकडे पैसा, गाडी, बंगला, घालायला कपडे, शिक्षणासाठी सुख सुविधा नसल्या तरीही तो कुणाला दोष देत नाही. अगदी सुखी समाधानाने आपले जीवन निसर्गाच्या सानिध्यात जगत आहे.

**आदिवासी कोण आहेत ?**

भारतात आदिवासी समाज हा अति प्राचीन काळापासून राहत आलेला समाज आहे. त्याला

स्वतःची अशी एक समृद्ध सांस्कृतिक परंपरा आहे. तो येथील मूळ जंगलाचा राजा असून येथील मूळ भूमीचा तो भूमिपुत्र आहे. तसे पाहता आदिवासी समाजाविषयीचा पूर्वग्रह दूषित दृष्टिकोन इतर समाजामध्ये आहे. त्यामध्ये तो अर्धनग्न राहतो, कच्चे मास खातो, भूत-पिशांच्यावर विश्वास ठेवतो. रानटी व पशुवत जीवन जगतो. मात्र या पूर्णतः चुकीच्या कल्पना आहेत. ज्या गैरसमजातून आलेल्या आहेत हे लक्षात येते. आदिवासी म्हणजे 'आद्य' सुरुवातीपासूनच अशा अर्थाने आहे. थोडक्यात, 'मूळ' या अर्थाने हा शब्द येथे अपेक्षित आहे. त्याविषयी खालील काही मते पाहू.

**'आदिवासी' व्याख्या**:

**डब्ल्यू. जे. पेरी:**

"समान बोलीभाषा बोलणाऱ्या व एकाच भूप्रदेशावर राहणाऱ्या समूहाला आदिवासी समाज असे म्हणतात."[१] किंवा "मानवाचा इतिहास जेथून सुरू होतो, त्यापूर्वी ज्यांची पावले या देशाच्या भूमीत उमटली गेली. त्या मानवी समूहाला आदिवासी म्हणतात."[२] सदरील मतावरून आदिवासी समाजाची आदिम लक्षणे स्पष्ट होतात. आदिम समाज हा इतर कोणत्याही समाजापेक्षा अनेक दृष्टीने वेगळा असल्याचे आपल्या लक्षात येते. एकच भूप्रदेश एकाच रक्त संबंधावर आधारित स्वतःची बोलीभाषा, लिपीचा अभाव, वेगळी जीवनपद्धती, साधी अर्थव्यवस्था, समान देवधर्म आदी गोष्टीवरून आदिवासी समाजाचे सामाजिक व सांस्कृतिक वेगळेपण आपल्याला लक्षात येते.

**आदिवासींचे समाजजीवन**:

जल - जंगल - जमिनीला आपली संपत्ती म्हणून जीवन जगणाऱ्या आदिवासी पुरुषांच्या कमरेला लंगोट तर कधी गुडघ्यापर्यंत धोतर, अंगात कोपरी, खांद्यावर उपरणे असते. तर स्त्रियांचा पोशाख मात्र प्रत्येक जमातीनुसार वेगवेगळा असतो. बहुतेक स्त्रियांच्या डोक्यावर 'फडकी' नावाचे वस्त्र असते. हे वस्त्र लाल रंगाचे डिझाईन करून कल्पकतेने तयार केलेले असते. भिल्ल जमातीतील स्त्रिया या नऊवारी लुगड्याचे दोन तुकडे करून नेसतात. तर दुसरा तुकडा डोक्यावर घेतात. अशा प्रकारे प्रत्येक जमातीत हा पेहराव वेगवेगळा असतो. आदिवासी जमातीतील माडिया, गोंड, कोलाम, कातकरी, पारधी यांचे जीवन अध्यापही सुधारलेले नाही. आदिवासी समाजात बोलीभाषा हा शिक्षणासाठी महत्त्वाचा अडसर आहे. महाराष्ट्रामध्ये आदिवासींच्या प्रदेशा नुसार वेगवेगळ्या बोलीभाषा आहेत. त्यातील काही मराठी भाषेच्या बोलीभाषा आहेत. ज्यांना मराठी बोलीभाषा बोलता येते ते अलीकडील काळात शिक्षणाच्या प्रवाहात हळूहळू येत आहेत. मात्र कोकरू, भिल्ल, कोलाम आदी जमातींना मराठी येत नसल्याने त्यांच्यासाठी शिक्षणात व इतरही भौतिक विकासामध्ये अडसर येत आहेत. त्यांच्यापर्यंत मूळ आचार - विचारांचे आदान प्रदान होताना दिसत नाही.

आदिवासी समाज आजही काही प्रमाणात जंगलात रानावनात राहत असल्याने त्यांना उपलब्ध साधनांच्या आधारेच आपली उपजीविका भागवावी लागते. लाकडाचा कोळसा, दारू, मध, डिंक, झाडांचा पाला, गवत, पशुपक्षी आदी त्यांच्या अर्थार्जनाची साधने आहेत. यामध्ये मोहाच्या झाडाचा सिंहाचा वाटा आहे. मोहाच्या फुलापासून ते दारू, पानापासून मुडे, बियापासून खाद्यतेल, तर लाकडापासून कोळसा, सरपण मिळवतात. एकंदर मोहाचे झाड हे त्यांच्यासाठी सर्व दृष्टीने आरोग्यासाठी लाभदायक असल्याने आदिवासींसाठी हे झाड कल्पवृक्ष आहे. "आदिवासी

जमातींना प्राचीन संस्कृती आहे. अनेक रूढी, परंपरा, उपासना, आदिवासी समाजाने हजारो वर्षापासून जतन केल्या आहेत. आधुनिकीकरण आदिवासी समाजापर्यंत पोहोचल्यामुळे या आदिम संस्कृतीचा ऱ्हास होण्याची शक्यता निर्माण झाली आहे."[३] असे आपले मत कुंडलिक पारधी व्यक्त करतात. त्यांचे हे मत सत्यही आहे. कारण, आदिवासी समाजामध्ये ज्यांच्याकडे शेती आहे. तो पारंपारिक पद्धतीने शेती करतो. आदिवासींची शेती ही पारंपारिक पद्धतीची व पावसाच्या पाण्यावर आधारित असते. आज घडीला आधुनिक काळातही त्यांच्यापर्यंत सुधारित बियाणे व रासायनिक खते न पोहोचल्यामुळे तो पारंपारिक शेती करतो. त्यांच्यापर्यंत कुठल्या शेतीविषयक शासकीय योजना पोहोचत नाहीत. शिवाय त्यांच्या पिकाला योग्य बाजार भाव मिळत नसल्याने तो नेहमी संकटात असतो. त्याच्या अडचणीमुळे शासन दरबारी त्याला योग्य कागदपत्रांचा पाठपुरवठा करता येत नाही. पर्यायाने त्याला खाजगी सावकाराचे कर्ज घ्यावे लागते. पीक आल्यावर सावकार कमी भावाने त्याचे धान्य, पीक खरेदी करतो. त्याची आयुष्यभर अशीच फसवणूक चालू राहते. तरीही निसर्गाच्या सानिध्यात राहणारा आदिवासी स्वतःला प्राणी - पक्षांच्या किलबिलाटात सुखी समजतो. तो आपल्या प्रदेश संस्कृतीबद्दल आपुलकी जपत जगत असतो. मात्र आता तो हे सर्व आधुनिकीकरणाच्या बदलात बदलू पहात आहे.

**आदिवासी समाज संस्कृती:**

आदिवासी समाज मूलतः निसर्ग पूजक आहे. आदिवासी समाज - संस्कृतीमध्ये निसर्ग जास्त प्रमाणात येतो. पारंपरिक पद्धतीने जीवन जगण्यास आदिवासी समाजाने निसर्गाची सोबत ठेवलेली आहे. त्यांच्या संपूर्ण आयुष्यावर निसर्गाचा ठसा उमटलेला आहे. कारण त्यांचे निसर्गावर अतूट प्रेम आहे. निसर्गाविषयीची त्यांची आपलेपणाची भावना महत्त्वाची आहे. निसर्गासह दऱ्याखोऱ्यात आदिवासी समाज स्वतःला सुरक्षित मानतो. आदिवासी समाज व निसर्ग यांचा यामुळे जवळचा संबंध आहे. निसर्ग हाच त्यांचा देव आहे. त्यांची संस्कृती ही त्यांच्या आनंदाचा स्त्रोत आहे. आदिवासी समाज हा निरक्षर असलेला दिसेल, मात्र तो सुसंस्कृत आहे. त्यांची स्वतःची बोलीभाषा, संस्कृती, रुढी, प्रथा - परंपरा, रीतीरीवाज, दैवते, धर्म, विधी, सण - समारंभ हे वेगवेगळे आहेत. आदिवासी समाज हा "आपल्या पूर्वजांनी साजरे केलेले आपल्या संस्कृतीने आपल्याला दिलेले सर्व सण उत्सव साजरे करतो. गाणे गातो, नृत्य करतो, काम धंद्यातून थकल्यावर थोडा विरंगुळा म्हणून किंवा इतर उत्सवांमधून तो आपला विरंगुळा नृत्यातून करत असतो. नृत्यासाठी तो प्रवृत्त होतो. त्याची पावले थिरकू लागतात. त्याचे एक दुसरे महत्त्वाचे कारण आहे. ते म्हणजे आदिवासी वाद्य. आदिवासी वाद्य ही आदिवासी गायन व नृत्य यातील महत्त्वाची गोष्ट आहे. आणि आजही या सगळ्या आदीम परंपरा तो जपत सांभाळत आला आहे."[४] असे आपले मत आदिवासी अभ्यासक हनुमंत भवारी मांडतात. आदिवासी समाजाला शहरी संस्कृतीचा संपर्क न झाल्यामुळे वैशिष्ट्यपूर्ण चालीरीती जपणारी संस्कृती त्यांच्या मध्ये दिसते. आदिवासी संस्कृतीच्या जडणघडणीमध्ये निसर्गाचा फार मोठा वाटा आहे. पारंपरिक जीवन जगण्यामध्ये आदिवासींची निसर्गाने संगत केली. त्यामुळे निसर्गाच्या सानिध्यात त्याच्या धार्मिक रूढी परंपरा निर्माण झालेल्या आहेत. निसर्गाच्या सानिध्यातच त्या पूर्ण होतात. निसर्गात जी जी गुढ अनाकलनीय आहे. ते सर्व पूजनीय आहे. असे आदिवासी मानतात. आकाश चंद्र, सूर्य, तारे, ढग,

वीज, झाडे, प्राणी, पक्षी आदी नैसर्गिक गोष्टींची ते पूजा करतात. डोंगरदेव, गावदेव त्यांचा भगत, मांत्रिक आदीवर ते प्रचंड विश्वास ठेवतात. थोडक्यात आदिवासी समाज हा निसर्गाच्या सानिध्यात राहत असल्यामुळे त्याचा त्यांच्या जीवनावर सभोवतालच्या वातावरणाचा ठसा उमटलेला दिसतो. दिवसेंदिवस तो त्याच्या संस्कृतीचे जतन करत आलेला आहे.

**समारोप**:

आदिवासी समाज हा सतत नैसर्गिक घटकांशी तडजोड करत जीवन जगत आलेला समाज आहे. निसर्गाशी एकरूप होऊन त्याच्याशी तडजोड करत वेळप्रसंगी निसर्गसाठी आपल्या जीवन पद्धती व संस्कृतीतही तडजोड करत अतिशय खडतर, निरस पद्धतीने जीवन जगणारा हा समाज आहे. तडजोडीमुळे त्यांच्या आयुष्यात दारिद्र्य, संघर्ष येत आहे. जंगल, जल, जमीन, पशुपक्षी, सण - उत्सव, नृत्य, बाजार, लग्नविधी, जन्म व अंत्यविधी, जात पंचायत आदी गोष्टींचा आदिवासी समाज व संस्कृतीमध्ये अंतर्भाव होतो.

**निष्कर्ष:**

1. भारतीय समाजव्यवस्थेत आदिवासी समाजामुळे विविधतेत एकता असल्याचे दिसून येते.
2. आदिवासी समाज हा जल, जंगल, जमीन व पशुपक्षांवर मनोभावे प्रेम करणारा समाज आहे.
3. आदिवासी समाज हा जीवनाकडे सकारात्मकतेने पाहणारा समाज आहे.

**संदर्भ** :


१. जाधव सुधाकर, 'भारतातील आदिवासी समाज', चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद, प्र.आ. २०१२, पृ.१४.

२. तत्रैव, पृ.९.

३. गिरधारी भास्कर व इतर (संपा.), 'वनपुण्याई' जनजाती साहित्य विशेषांक, नोव्हेंबर - डिसेंबर २०२१ नाशिक, पृ. ११.

४. साळवे शशिकांत (संपा.), 'आदिवासी साहित्य समाज संस्कृती आणि विकास', यशोदीप पब्लिकेशन्स, पुणे, प्र. आ. २०१८, पृ. ३४१.